# लोकसाहित्याचे महत्त्व

**डॉ. सविता विश्वास पांडे**
(मराठी विभाग प्रमुख)
राधा महाविद्यालय, रेशीमबाग , नागपूर
मो. नं.- ७५०७९१६४४४
Email ID - savita.vpande@gmail.com

---

कोणत्याही संस्कृतीचा अभ्यास करायचा असेल तर सर्वप्रथम त्या संस्कृतीतील लोकसाहित्याचा अभ्यास करावा लागतो. या दृष्टीने लोक साहित्याचे स्थान महत्त्वाचे आहे. लोक साहित्यातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. समाजातील सुख - दुःख, आशा - निराशा, श्रद्धा - अंधश्रद्धा लोक साहित्यातून दिसून येते. ओव्या, भारुडे, पोवाडे, लावण्या, अभंग, गोंधळ, लोकगीते इ. तून भावनांची अत्यंत सृजनशील अभिव्यक्ती निर्माण होते. लोकसाहित्याचे महत्त्व सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याला सांस्कृतिक ओळख जपणारे साहित्य असेही म्हटले जातात. लोक साहित्य समाजाच्या परंपरा, रीती रिवाज, भाषा व संस्कृतीचे प्रतीक आहे. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते.

दैनंदिन जीवनात म्हणी, उखाणे, वाक्प्रचार यांचा आपण सहज वापर करतो. वडीलधाऱ्यांकडून लहानांपर्यंत बोलीभाषेतून गाणी, म्हणी, उखाणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक रूपात हस्तांतरित होत असते. लोकसाहित्यात प्रत्येक भाषेतील आत्मा सामावलेला असतो. त्यामुळे लोकंसाहित्य जिवंत आहे. आपल्या देशामध्ये प्रत्येक कार्यक्रम प्रसंगी गाणी गायली जातात. वेगवेगळ्या स्वरूपाच्या गोष्टी ऐकवल्या जातात. गाणी तसेच गोष्टीचे रूपांतर नृत्य, नाटके , लावणी , तमाशा अशा स्वरूपात होऊन ती लोक साहित्याच्या रूपातून भारतीय संस्कृतीची जपणूक करतांना दिसते.

मौखिकतेतून लोकांमध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेले, समाजाच्या संस्कृतीशी निगडित असलेले साहित्य म्हणजेच लोक साहित्य असे म्हणावेसे वाटते.

**लोक साहित्याची वैशिष्ट्ये :**

१) एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली संस्कृती ज्या साहित्यातून मिळते ते लोकसहित्य.
२) संस्कृतीतील रूढी, परंपरा , लोकजीवन या अनुषंगाने येणाऱ्या मौखिक गीतरचना लोकसाहित्यात येतात.
**उदा**. - लोककथा, म्हणी, उखाणे, अंगाई गीते इत्यादी.
३) पारंपरिकता हे लोक साहित्याचे वैशिष्ट्य आहे.
४) लोकसाहित्य हे समूहनिर्मिती चे असते.

**लोकसाहित्याचे प्रकार :**

१) **लोककथा :**

मानवाला गोष्ट सांगणे व एकणे आवडत असते. त्यातून कथा हा वांङ्: मय प्रकार निर्माण झाला. सर्वप्रथम कथा ही मौखिक रूपात होती. मौखिक परंपरेने चालत आलेली कथा ही लोककथा होय. लोककथेमध्ये वाक्य आणि रचना लहान लहान असते. भाषा ओघवती व जिव्हाळ्याची असते. लोककथा सर्वसामान्यांच्या मनाच्या कोपऱ्यात ठाण मांडून बसलेली असते. ती आपलेच वर्णन करते हा भास कथा वाचत असताना होतो.

दैवत कथा या धर्म कल्पनेशी संबंधित असतात. तर परिकथा, उत्पत्ती कथा, दंतकथा, व्रतकथा, बोधकथा, हास्य कथा या कथांमधून अदभूत विलक्षण जग, सृष्टीची उत्पत्ती कथा, पौराणिक कथा, लोक जीवनात धर्माला महत्त्व असल्यामुळे व्रतांच्या कथा , प्राणी, पशु , पक्षी यांच्या आधारावर असलेल्या कथा. इ.

२) **लोकगीते** :

लोकगीते म्हणजे लोकांच्या अनुभवांशी, भावभावनांशी संबंधित गीते. या गीतांमध्ये मौखिक परंपरेतून सामाजिक सांस्कृतिक ,धार्मिक, कौटुंबिक घटनांशी संबंधित गीते असतात. समाजातील जीवनशैलीचे, संस्कृतीचे प्रतिबिंब त्यात असते.

लोकगीतांची परंपरा ही वैदिक काळापासून चालत आलेली आहे. लोकगीतांमधून समाजाचे विचार विश्व व कल्पना विश्वाचा आविष्कार होत असतो. लोकगीतांना काळाचे बंधन नसते. ते कालातीत असते. लोकगीतांतून लोक संस्कृतीचे दर्शन होते.

**लोकगीतांचे प्रकार** :

**स्त्री- गीते :**

स्त्रियांना सूर्योदयापूर्वीच घरातले कामे करावी लागत असे. घर कामे करत असताना ती सहज व्हावी म्हणून स्त्री स्वतःच गाणी रुचू लागली . ती संवादाच्या रूपाने गाणे म्हणत होती. ते दळण दळताना जात्याला म्हणते,

"दळण दळावे जस चंदन किसावं"

अशा सहज ओळीतून दैनंदिन जीवनातील काम करण्याची शैली दिसून येते. लोकगीतातून स्त्रीचे श्रम कळते. आपल्या जीवनातील प्रत्येक घटना तिने गीतातून मांडल्या आहे. तिच्या गाण्यामधून देवतांचा उल्लेख येतो. तसेच भोंडल्याची, गौराईची गाणी स्त्री किशोरवयापासूनच गाऊ लागली.

गौराईच्या गाण्यातून स्त्रीला आपले माहेरपण आठवते, अनेक स्त्री गीतातून स्त्रीचा संसार, पुरुषांप्रती असलेले प्रेम, तिचे श्रद्धाळू मन या प्रेमाळ स्वभावामुळे स्त्री गीते रचू लागली. त्याचे स्वरूप लोकगीतांमध्ये झाले. ती पंढरपूरच्या विठ्ठलावर सुद्धा गाणे म्हणते , त्यातून स्त्रीने अस्सल भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले.

**पुरुषांची लोकगीते :**

पुरुषांनी आपल्या श्रमातून जी गीते गायली ती श्रमगीते होय. गोंधळीतून देवतांना आव्हान करतात.

पोतराज म्हणजे मरीआईच्या देवदेवतांना उपासना करताना म्हणतात ते गीते. तसेच वासुदेव हा श्रीकृष्णाचा उपासक. तो धर्मोपासनेचे काम करणारा. वासुदेव हा लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे. वाघ्या मुरळी, डहाका इ. लोकगीतातून पुरुषांच्या गीतांची रचना कळते.

लोकगीताचे वर्गीकरण तीन प्रकारात केल्या जाते. स्त्रियांची लोकगीते, पुरुषांची लोकगीते, लहान मुलांची गीते. यामध्ये स्त्रियांच्या गीतांची संख्या जास्त आहे. भावात्मकता, सामूहिकता, स्थलांतर क्षमता ही लोकगीतांची वैशिष्ट्य म्हणता येईल.

**लोककथा** :

भारताला लोककथांचे माहेर म्हटले जाते. वेदवाङ्: मय, पुराणवाङ्: मय या ग्रंथातून लोककथा दिसून येतात. आज अनेक लोककथा प्रचलित आहेत. जातक कथा या कथेमध्ये गौतम बुद्धांच्या पूर्व जन्माचे वर्णन करणाऱ्या गोष्टी येतात. जैन कथा, बृहत कथा, पंचतंत्र, वेताळ पंचविशी, सिंहासन बत्तीशी अशासारख्या अनेक कथातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते.

**लोकनाट्य** :

निखळ मनोरंजन या उद्देशानेच लोकनाट्याचे सादरीकरण होत असते. रुढी, प्रथा, परंपरा कशी असावी याचा संदेश लोकनाट्य देत असते. दंडार, भारुड, पंचमी ही लोकनाट्य धार्मिकतेचा अनुभव देतात तर रामायण ,महाभारत या पौराणिक ग्रंथातून संस्कृतीची आस्था दिसून येते. सर्व स्तरातील माणसांचे आयुष्य भारुडात दिसून येतात. महाराष्ट्रात तमाशा हा लोकनाट्यप्रकार फार प्रसिद्ध आहे. यातून सामाजिकता स्पष्ट होते. काळानुसार बदल घडत असतो. त्यानुसार बदलत्या काळाचे प्रतिनिधित्व लोकनाट्यातील कलावंत करीत असतात. त्यामुळे लोकनाट्यातून सामाजिक वास्तवतेचे दर्शन घडत असते.

**समारोप** :

लोकसाहित्य हे समाजाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक जडणघडणीचे अत्यंत महत्त्वाचे कार्य करते. या साहित्यातून समाजातील सर्व स्तरांच्या जनतेचे जीवन श्रद्धा, विचार- सरणी, रुढी, परंपरा दिसून येते. यातून जगण्याचे तत्व उलगडलेले दिसते. लोककथा, लोकगीते, ओव्या, भावगीते, गवळण, पोवाडे अशा विविध माध्यमातून हे साहित्य पिढ्यानपिढ्या जपले गेले आहेत. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही लोकसाहित्य जपले गेले आहे. यामुळेच आपण आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहतो. लोकं साहित्य केवळ करमणूक नसून ते संस्कृतीचे जिवंत दस्ताऐवज आहे. त्याचे संवर्धन करणे ही आपली संस्कृतीक जबाबदारी आहे.

**निष्कर्ष** :

लोक साहित्य हे जनसामान्यांचे प्रतिबिंब आहे. ते समाजाच्या विचारधारा, श्रद्धा, चालीरीती, जीवनशैली यांचे जतन करणारे माध्यम आहे. लोक साहित्याचे भाषेच्या समृद्धीसाठी महत्त्वाचे योगदान आहे. परंपरा, श्रद्धा, अनुभव आणि जनसामान्यांचे विचार यांचा संग्रह लोकसाहित्यातून होतो. लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारे साधन

म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व आहे.

**संदर्भसूची :**


- लोकवाङ्: मय : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- लोकसाहित्य : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक